*पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या जाहीर सभेला मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन*

*1 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता वर्धा येथे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांची जाहीर सभा*
==============================================================

पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सरकार स्थापन झाल्यापासुन देशाच्या सर्व स्तरातील नागरिकांचा विकास हे पंतप्रधानांचे ध्येय राहीले आहे. शेतकरी, शेतमजुर, कामगार, महिला, युवक, विद्यार्थी- विद्यार्थीनी, युवा, उद्योजक, सैन्य दल अशा सर्व घटकांचा विचार करत रस्ते विकास, पायाभुत सुविधा, विमानतळ बांधणी अशा विविध क्षेत्रात प्रगतीची शिखरे गाठत मोदीजींच्या नेतृत्वात आपला देश निरंतर विकासाच्या मार्गावर आगेकुच करीत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या वर्धा जिल्हयात पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी प्रचार दौ-यासाठी येत आहेत. या देशाला बलशाली राष्ट्र करण्यासाठी नवी उर्जा आणि मोठी शक्ती घेवुन ते जाणार आहे. त्यांच्या या विराट सभेला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अर्थमंत्री तथा वर्धा जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले आहे.
दि. 31 मार्च रोजी वर्धा येथे आयोजित भाजपा-शिवसेना-रिपाई (आ) महायुतीच्या पदाधिका-यांच्या बैठकीत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार बोलत होते. दि. 1 एप्रिल रोजी वर्धा येथे आयोजित पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या जाहीर सभेच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आ. पंकज भोयर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेश बकाने, नगराध्यक्ष अतुल तराळे, संघटन मंत्री गुंडु कावळे, सुधीर दिवे, अविनाश देव, जयंत येरावार, पंकज सायंकार, प्रशांत बुरले आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.
यावेळी बोलतांना सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले, शेतक-यांच्या खात्यात दरवर्षी सहा हजार रूपये जमा करण्याचा निर्णय व त्या निर्णयाची त्वरेने झालेली अंमलबजावणी, प्रधानमंत्री पिक विमा योजना, ग्राम सिंचाई योजना, सॉईल हेल्थ कार्ड स्किम, सुकन्या समृध्दी योजना, धनलक्ष्मी योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत, मेक इन इंडिया, स्किल इंडिया, मुद्रा योजना, स्टार्ट अप योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातुन देशातील सर्व सामान्य जनतेला न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी केला आहे. सैन्य दलाची वन रँक वन पेंशन ही मागणी गेल्या कित्येक वर्षापासुन प्रलंबित होती. ही मागणी नरेंद्रभाई मोदींनी पुर्ण करुन सैन्य दलात चैतन्य निर्माण केले. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकच्या माध्यमातुन आतंकवादाला चोख उत्तर देत सैन्य दलाचे मनोबल उंचावणारे नरेंद्रभाई या देशाचे भुषण आहे. अशा या विकास पुरुषाला ऐकण्यासाठी वर्धा जिल्हयातील नागरिकांनी या जाहीर सभेला मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.
या बैठकीला भाजपा, शिवसेना, रिपाई (आ) चे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या सभेच्या तयारीचा आढावा घेतला. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांची जाहीर सभा दि. 1 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता वर्धा येथील स्वावलंबी विद्यालयाच्या मैदानात आयोजित करण्यात आली आहे.